“ पश्चिम महाराष्ट्रातील रोलर स्केटींग या खेळाची

सद्यस्थिती व त्याच्या वाढीसाठी

करावयाच्या उपाययोजनेचा

चिकित्सक अभ्यास ”

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या

पी.एच.डी. (शारीरिक शिक्षण) या पदवीसाठी

सादर करण्यात येणारा

‘संशोधन आराखडा’

❖ संशोधक ❖

श्री.महेशचंद्र अभिमन्यु कदम

❖ मार्गदर्शक ❖

प्रा.डॉ.सौ.शारदा अतिरूध्द संगावार
एम.ए.एम.पी.एड.पी.एच.डी.
के.आर.एम.महीला महाविद्यालय,
वजीराबाद, नांदेड

मे २०१६

अनुक्रमणिका

अ.नं.	शिर्षक	पृष्ठ क्र.
१	प्रस्तावना	३
२	संबधित साहित्याचा आढावा	५
३	समस्येचे विधान	७
४	समस्येचे स्पष्टीकरण	७
५	परिभाषिक शब्दांच्या व्याख्या/अर्थ	८
६	संशोधनाचे महत्त्व	८
७	संशोधनाची उद्‌दिष्टये	१०
८	संशोधनाची गृहितके	१०
९	संशोधनाची व्याप्ती	११
१०	मर्यादा	११
११	संशोधनाची कार्यपध्दती	१२
१२	प्रकरण योजना	१४
१३	संशोधनाचे वेळापत्रक	१६
१४	संदर्भ ग्रंथ	१७

१.प्रस्तावना :—

स्केटींग खेळ या खेळा बद्दल वेगवेगळया देशातील लोकांच्याकडुन सांगीतले जायच परंतु या खेळाचे प्रात्यक्षीक कोणीच दाखविल गेलेले नव्हते त्यामुळे या खेळाबाबत संधीक्ता होती. कांही जनानी या खेळा बद्दल संशोधन करून त्याचा इतिहास रचला गेला.

या स्केटींग खेळाचा शोध १८ व्याशतकामध्ये एका डचमानसाने लावला. सन १७१० मध्ये फायबर सारख्ये साहित्य वापरून स्केट बनवण्यात आले.खर म्हणजे ते आईस स्केटींगसाठी ते वापरावयास योग्य आहे असे त्यावेळी ते कळुन आले.सन १७६० मध्ये बेलजीयम जोसेफ मेरीन डी हुय या लंडन मध्ये रहिवासी असणाऱ्या मानसाने रोलर स्केट चा शोध लावुन ते मॅन्युफ्याचर (तयार,बनविले) केले.

सन १७९० मध्ये घोतइच होफकंलदर (जर्मन)येथे पतिन टेरे या स्केटस ग्राउंडवर रोलर स्केटींगचे प्रात्यक्षिक झाले यामध्ये पॅरीस ॲकेडमी चे आर्टीस्टनी सहभाग घेतला होता.

सन १८४०मध्ये अर्टीस्टीक स्केटींग प्रॉडक्टचे प्रातेशिक(शो) पॅरीस येथील पोर्ट शाइन मतीन या थेटरमध्ये दाखविणेत आले.दि.१७/१/१८६४ इ.रोजी फेमस फामाउस गीकोमो मायबीर यांनी कांही स्केटरांच्या सल्याने स्पर्धा घेतली त्यामध्ये स्केटरांनी चांगली कामगीरी दाखविली त्यावेळी कांही फोटोग्रापर व वार्ताहर हजर होते.त्यांनी या खेळा बद्दलची माहिती लिहुन प्रसिध्द करून स्केटींग खेळाला खेळामध्ये प्रमोट करावे अशी सिफारस केली.

सन १८६१ मध्ये गरसिन या फ्रेंच मानसाने कांही इंडस्ट्रीअल इंजीनीअरना वर्ड फेअर पॅरिस येथे बोलवुन हा खेळ प्रसिध्द केला.त्यामुळे

या खेळाला चालना मिळाली सन १८६६मध्ये जगात पहिली स्केटींग रिंक

न्युपोर्ट (ऱ्होड इजल्यांड) येथे बांधण्यात आली आणि येथुनच स्केटींग खेळाची सुरवात झाली.

दिनांक २१ एप्रील १९२१ इ.राजी स्वीझरलंड येथील कॅसिनो यथे मिंटीग फेडरेशन स्थापन करणेसाठी बोलविणेत आली. फेडरेशन इंटरनॅशल ऑफ रोलर स्केटींग या नावाने फेडरेशन स्थापन करून मीस्टर वॉलकेर जर्मनी,मिस्टर स्टेइंफींकेल,मिस्टर सालोमन,फ्रान्स जेसेट केनेल,मिस्टर वालीस ग्रेट बिटन आणि मिस्टर अबलस,अलबर्ट मयर,ओटो मयर,रेनकवीटज आणि सेलटमेर स्विझंलंड याप्रमाणे पहीली इंटरनॅशनल फेडरेशनची बॉडी त्यावेळी अस्तीत्वात आली.

भारतात सुध्दा स्केटींग खेळ फार पुर्वीपासुन खेळला जात होता.या खेळाचा भारतामध्ये सुध्दा बराच इतिहस आहे कारण सिमला,श्रीनगर,जम्मु काश्मीर या ठीकाणी हा खेळ वार्षिक उत्सवामध्ये खेळला जायचा त्यानंतर त्याचे रोलर स्केटींग या प्रकारचा खेळ सुरू झाला परंतु या खेळाचा प्रसार ज्यावेगाने व्हायला पाहिजे होता तसा झाला नाही.या खेळाचा प्रसार व्हावा व जास्तीत जास्त स्केटर तयार करणेसाठी प्रत्येक राज्यामध्ये स्केटींग खेळाचे प्रशिक्षण देउन स्केटर तयार करण्याचे कार्य करून या खेळाची राष्ट्रीय संघटना सन १९५५ मध्ये स्थापन झाली.

रोलर स्केटींग फेडरेशन ऑफ इंडीया (आर.एस.एफ.आय.) ही संघटना स्थापन करण्यात आली. स्केटींग खेळाचे महत्व पटवुन देऊन केद्र सरकारची मान्यता घेण्यात आली ही संघटना एशीयन व आंतरराष्ट्रीय स्केटींग संघटनेशी सलग्न करून खेळास चालना दिली. आता भारतीय संघ एशीयन व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनीधीत्व करतो आहे.

स्केटींग खेळाची लोकप्रियता फार वाढली असुन २ ते २० वर्षापर्यंतची

मुले व मुली या खेळामध्ये तयार होत आहेत.यामध्ये इनलाईन व क्वॉड

स्केटींग असे दोन प्रकारात स्केटींग खेळाच्या स्पर्धा असुन अतीशय गतीमान व दमदार असा खेळ निर्माण झाला आहे.

पश्चिम महाराष्ट्रतील रोलर स्केटींग खेळाचा सदस्थितीचा अभ्यास व त्याच्या वाढीसाठी करावयाच्या उपाययोजनेचा चिकीत्सक अभ्यास व संशोधनाचा विषय निवडण्या मागील मुळ कारण म्हणजे रोलर स्केटींग खेळाच्या प्रसारासाठी व त्या खेळाला देशात प्रगतीपथावर नेहणाऱ्या खेळाडुंचे (स्केटरांचे) संशोधन होणे गरजेचे आहे.पश्चिम महाराष्ट्र अंतर्गत सांगली, सातारा, सिंध्दुदुर्ग,रत्नागीरी व कोल्हापूर हे पाच जिल्हे येतात त्या पाच जिल्ह्यांचा अभ्यास केल्यास रोलर स्केटींग खेळाचे खेळाडु अत्यंत अल्प असुन कनिष्ट महाविद्यायीन स्पर्धेत सहभागी होणारी कनिष्ट महाविद्यायांची संख्या कमी आहे.

२. संबधित साहित्याचा आढावा :—

आज जगभरात व भारतात देखील अनेकविध क्रीडा प्रकार व खेळ प्रचलित आहेत.त्या प्रत्येक प्रकारांचे नियम,कौशल्य,त्यासाठी लागणारे साहित्य, त्याच्या आयोजन,नियोजनाच्या पध्दती वेगवेवळया आहेत व ह्या सर्व बाबी ज्या त्या खेळातील संघटना, महासंघ व्दारा निश्चीत केल्या जातात. तसेच विविध क्रीडा प्रकरातुन किंवा खेळामधुन व्यक्तीमत्वाच्या विविध घटकामध्ये वाढ व विकास होतो. असे सर्वसाधारणपणे सांगीतले जाते.थोडेफार जे संशोधनात्मक अभ्यास आजवर झालेले आहेत त्यातुन योगाभ्यासाव्दारा काय फायदे होतात.बास्केटबॉल,फुटबॉल ह्या सारख्या खेळाव्दारा कोणकोणते लाभ मिळतात हे ढोबळ मानाने सिध्द करण्यात आले आहे. परंतु प्रत्यक्षात विविध खेळाचे किंवा क्रीडा प्रकाराचे संपुर्ण विश्लेषण अध्याप झालेले नाही तेव्हा प्रस्तुत अभ्यासाशी निगडीत संदर्भ मोठया प्रमाणात उपलब्ध नाहीत.

तथापी रोलर स्केटींग खेळाच्या अनुषंगाने आजवर झालेल्या

विविध संशोधनात्मक अभ्यास व अनुषांगीक ग्रंथ साहित्य यांचे सिंहावलोकन केले असता खालील संदर्भ आढळले.

१.१९८१ ए.ग्रिको (अर्जेंटीना) भारतीय रोलर स्केटींग स्कुलची दिल्ली येथे स्थापना केली २०० ते ३०० स्केटर तयार करून त्यांच्या खुल्या राष्ट्रीय स्पर्धा घेवून या स्पर्धेमधुन खेळाडुच्या खेळातील विविध कौश्यल्य पाहुन त्यांच्या विविध चाचण्या घेवून खेळातील प्रगतीसाठी अभ्यास करण्यात आला.

२. १९८९ शर्मा (दिल्ली) यांनी इंडीयन रोलर स्केटींग कॉन्फड्रेशन ची स्थापना केली व खेळाची नियमावली तयार केली.

३.१९९० गद्रो (दिल्ली) यांनी रोलर स्केटींग खेळाची माहिती पुस्तीका लिहीली.

४.१९९०दिल्ली,पंजाब,महाराष्ट्र,कर्नाटका,आर्धप्रदेश,केरळा,तामीळनाडु, उत्तर प्रदेश इत्यादी राज्यामध्ये स्केटींग क्लब व स्केटींग प्रशिक्षण केद्र सुरू केले या मधुन स्केटर तयार केले गेले असे प्रत्येक जिल्ह्यामध्ये ३००ते ४०० स्केटर तयार केले या नंतर जिल्हा व राज्य व राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन भारतीय रोलर स्केटींग फेडरेशन यांनी केले.यामध्ये पाच प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या स्पीड,अर्टीस्टीक,रोलर हॉकी,फीगर स्केटींग,पेअर स्केटींग या प्रकारात स्केटींगच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

५.२०१३ ढवण आनंद अबंऋशी व प्रितम ओहाळ (पुणे)शिवाजी विद्यापीठाच्या वतीने महावीर कॉलेज कोल्हापूर येथे दोन दिवसाच्या राष्ट्रीय कॉनफरन्समध्ये शालेय स्तरावरील स्केटींग खेळाडुंच्या मुल्यमापनासाठी कसोटीचे विकसन या विषयावर पेपर

३.समस्येचे विधान :–

“पश्चिम महाराष्ट्रातील रोलर स्केटींग या खेळाच्या सद्यस्थितीचा अभ्यास व त्याच्या वाढीसाठी करावयाच्या उपाययोजनेचा चिकित्सक अभ्यास”

४. समस्येचे स्पष्टीकरण :–

रोलर स्केटींग या खेळाचा जन्म परदेशातला आहे. फार प्राचीन काळापासुन तर या खेळाला महत्व आहे. पण भारतामध्ये इतकी मोठी लोकसंख्या असताना म्हणावा तितका या खेळाची वाढ होवू शकली नाही अमेरीका,अर्जेटींना,जपान,कोरीया,फ्रान्स या देशातील खेळाडुंची(स्केटरांची) चांगली प्रगती आहे.स्पर्धेचे आयोजन व नियोजनातुन स्पर्धा वाढते आहे मात्र किंवा ग्रामीण भागातील (महाराष्ट्रातील) खेळाडु तेथे पर्यंत पोहचणे मुस्कीलीचे झाले आहे म्हणुनच रोलर स्केटींग खळाची वाढ होणे व नव्याने प्रवेश करू इच्छिणाऱ्या खळाडुंना दिशा मिळावी त्याच प्रमाणे त्यासाठी लागणाऱ्या सोयी , क्रिडांगण सुविधांची उपलब्धता कशी वाढवता येईल यासाठी संशोधकानी पश्चिम महाराष्ट्रातील रोलर स्केटींग खेळाचा सद्यस्थितीचा अभ्यास व त्याच्या वाढीसाठी करावयाच्या उपाययोजनेसचा चिकीत्सक अभ्यास चा शिर्षकाला अनुसरून संशोधनाचा आराखडा तयार केला आहे.

५. परिभषिक शब्दांच्या व्याख्या/अर्थ :–

●१. रोलर स्केटींग :––रोलर स्केटींग असा एक खेळ आहे की या खेळामध्ये पायातील बुटाला प्लेट जोडलेली असते त्या प्लेटला पुढच्या बाजुस दोन व्हील (चाके) व पाटीमागील बाजुस दोन व्हील (चाके) असे दोन्ही पायाच्या बुटाना असते असे हे दोन्ही पायात बुट घालुन

स्केटरला (खेळाडुला) स्वत:चा तोल सांभाळत वेग घेत खेळावे लागते त्यास रोलर स्केटींग म्हणतात.

- २. वाढ :— सद्यस्थिती गुनात्मक व परिमाणात्मक होणारे बदल म्हणजे वाढ (विकास)हे बदल दृष्य किंवा अदृष्य स्वरूपात असतात म्हणुन वाढ (विकास) म्हणजे परिपक्वतेच्या दिशेने परिवर्तन किंवा प्रगतीकडे नेणारे स्थित्यंतर होय.

- ३.सद्यस्थितीचा अभ्यास :— वर्तमान काळातील चालू घडामोडी किंवा स्थिती जाणून घेणे.

- ४.चिकित्सक अभ्यास :— एखाद्या विषयातील सखोल ज्ञान किंवा मर्म जाणनेसाठी सर्व बाजूनी केलेली गुणदोषात्मक मिमांसा म्हणजे चिकित्सक अभ्यास होय किंवा एखाद्या गोष्टींच्या मुळाशी जावुन ती का व कशी घडते चा विषयी सर्व बाजूनी अभ्यास करणे.

६. संशोधनाची गरज व महत्त्व :—

रोलर स्केटींग खेळ परदेशी आहे.भारतासारख्या विकसनशील देशात सर्व खेळाना फार महत्च आहे.भारतामध्ये कांही खेळ दुर्लक्षीत आहेत.

तर कांही खेळांना अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे.तसे पाहता प्रमुख असणाऱ्या कलात्मक खेळाकडे लोकांचे मुळातच दुर्लक्ष आहे.रोलर स्केटींग हा खेळ लोकांपर्यंत विषेशत: ग्रामीण व शहरी भागात शास्त्रशुध्द पध्दतीने पोहचविण्याचे महत्वाचे कार्य संशोधनाच्या माध्यमातुन होणार आहे.असे दुर्लक्षीत खेळ जर लोकांपर्यंत नावारूपाला आणावयाचे असतील तर त्याचे महत्व लोकांना पटवून देणे गरजेचे आहे. क्रिडा क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या अनेक संस्था,असोशिएशन,

संघटना,मंडळे यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.यासाठी रोलर स्केटींग खेळाच्या प्रसारासाठी त्या खेळाला देशात प्रगतीपथावर नेहणाऱ्या खेळाडुंचे संशोधन होणे गरजेचे आहे. त्यामधुनच संस्थाचे अशा खेळावर आपला वेळ, पैसा व श्रम खर्चकरणारी दानशुर व्यक्ती/संस्था तयार होवुन हा खेळ वाढला हे पहाणे गरजेचे आहे.रोलर स्केटींग खेळाच्या सद्यस्थितीचे व त्यांच्या वाढीसाठी केलेल्या संशोधनामुळे ग्रामीण व शहरामध्ये रोलर स्केटींग सारख्या खेळाला महत्व प्रात्प होईल.या संशोधनामुळे भविषाकाळात नवीन खेळाडुंना संघटकांना प्रशिक्षकांना सदर संशोधन उपयुक्त ठरेल रोलर स्केटींग या खेळात नैपुन्य मिळविण्यासाठी खुप मेहनत घ्यावी लागते तसेच या खेळामुळे शारीरिक भरपुर व्यायाम होवुन स्नायु बलवान होतात व शरीर लवचीक होते.तसेच या खेळामुळे समजुतदारपणा धडाधडीपणा, एकाग्रहता या गुणांचा विकास होतो.शिवाय या खेळात दुखापत होण्याचे प्रमाण खुपच कमी असते म्हणुनच या खेळाचा प्रसार होणे गरजेचे असुन त्यातुनच शालेय,कनिष्ट महाविद्यालय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, स्पर्धेसाठी खेळाडू तयार होतील.

७. संशोधनाची उद्दिष्टये :—

१. पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हा संघटनेची स्थापनेची सविस्तर माहिती गोळा करणे.

२. पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हयातील रोलर स्केटींग खेळासाठी लागणाऱ्या सुविधांची सविस्तर माहिती घेणे.

३. पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यात होणाऱ्या स्पर्धा,यांच्या विषयी सविस्तर माहिति गोळा करणे.

४. पश्चिम महाराष्ट्रातील ज्या जिल्ह्यामध्ये स्केटींग सुरू आहे त्या जिल्ह्यातील खेळाडुं,प्रशिक्षक यांची माहिती घेणे.

५. वरील अभ्यासाला अनुसरून सध्यस्थितीतील त्रुटींचा शोध घेणे, रोलर स्केटींग खेळाचा अभ्यास करून तज्ञांची मते अजमावणे, मर्यादीत विस्ताराबाबत निष्कर्ष काढणे.

६. वरील बाबींचा विचार करून रोलर स्केटींग खेळाच्या वाढीसाठी लागणाऱ्या योजनांचे सविस्तर वर्णन करणे.

८ण गृहितके :—

- एच१ :— पश्चिम महाराष्ट्रातील रोलर स्केटींग खेळाच्या सद्यस्थितीमध्ये अनेक त्रुटी आहेत. परंतु कांही अंशी साम्यता देखील आहे.
- एच२ :— पश्चिम महाराष्ट्रातील रोलर स्केटींग खेळासाठी स्केटींग रिंगची संख्या कमी आहे.खेळात प्रशिक्षीत प्रशिक्षक कमी आहेत,या खेळाच्या स्पर्धा आयोजनाचे प्रमाण कमी आहे.
- एच३ :— पश्चिम महाराष्ट्रातील रोलर स्केटींग खेळासाठी स्केटींग रिंगची संख्या कमी आहे.खेळात प्रशिक्षीत प्रशिक्षक कमी आहेत. सद्यस्तितीचा अभ्यास करून त्यांच्या वाढीसाठी निश्चितच

उपाययोजना करता येणे शक्य आहे.

शुन्य परिकल्पना :—

- एच० :—पश्चिम महाराष्ट्रातील रोलर स्केटींग या खेळात प्रशिक्षण,सुविधा यांच्या कमतरतेमुळे या खेळाची प्रगती कमी

झाली असेल. सद्यस्थिती एकुणच भिन्न आहे व त्यांच्या वाढीसाठी करावयाची उपाय योजना यांच्यात परस्पर कांही संबध नाहीत.

९. संशोधनाची व्याप्ती :—

१. पश्चिम महाराष्ट्रातील रोलर स्केटींग या खेळाची सद्यस्थिती तपासणेसाठी रोलर स्केटींग असोसिएशन ,स्पर्धा व शालेय व कनिष्ट महाविद्यालयातील रोलर स्केटींग स्पर्धा यांच्या निरीक्षणात्मक अभ्यासातून तपासली जाईल. सदरचा अभ्यास या पश्चिम महाराष्ट्रातील असणाऱ्या सांगली, सातारा, रत्नागिरी ,सिंधुदुर्ग, कोल्हापूर या जिल्ह्यापुरताच सिमीत असेल.

२. सदर संशोधनात ज्युनिअर व सिनिअर पुरूष व महिला प्रशिक्षक, संघटक, वरिष्ट खेळाडू या सर्व गटाचा समावेश असेल.

१०. मर्यादा :—

१. प्रस्तुत संशोधन रोलर स्केटींग क्षेत्रापुरते मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे पश्चिम महाराष्ट्रातील सांगली,सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर या जिल्हा क्षेत्रापुरते मर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधन रोलर स्केटींग खेळाच्या सद्यस्थिती व वाढीसाठी करावयाच्या उपाय योजना आधारित असलेमुळे चा खेळाशी संबधित असोसिएशन,स्केटर(खेळाडु),प्रशिक्षक,संयोजक यांच्या मुलाखती व प्रश्नावलीवर आधारीत आहे.

४. प्रस्तुत संशोधन हे भुतकाळातील खेळाडु,प्रशिक्षक इतर संग्रहीत माहिती आधारीत आहे.

५. प्रस्तुत संशोधन हे रोलर स्केटींग खेळाच्या प्रसिध्द झालेल्या संबधित लेखनावर आधारीत आहे.

११. संशोधनाची कार्यपध्दती :—

अ. कार्यपध्दत

१. सर्व्हे पश्चिम महाराष्ट्रातील सोयी सुविधांचा व खेळाडुचा विस्तारीत अभ्यास.

२. वरील अभ्यासाला अनुसरून सध्यस्थितीतील त्रुटींचा शोध.

३. त्यासाठी लागणाऱ्या उपाययोजनांचा विस्तारीत अभ्यास.

४. वरील अभ्यासाला अनुसरून रोलर स्केटींग खेळाच्या मर्यादीत विस्ताराबाबत निष्कर्ष काढणे.

५ वरील बाबीचा विचार करून त्यासाठी लागणाऱ्या योजनांचे सविस्तर वर्णन करणे.

६.माहिती संकलन :—

१. खेळाडु — एकुण २००० खेळाडु (स्केटर) आहेत त्यापैकी सुगम यार्दाचीक पध्दतीने ३०० खेळाडु (स्केटर) ची निवड केली.

२. प्रशिक्षक — एकुण ५० प्रश्नावली भरून घेतली.

३. संघटक — एकुण २० मतावली भरून घेतली.

ब. संशोधनाची साधने

१. प्रकाशित साहित्य

२. इंटरनेटवरील माहिती

३. प्रश्नावली

४. मुलाखती

५. प्रत्यक्ष भेटी

क. संशोधनाची कार्यवाही

१. प्राथमिक स्त्रोत :— प्रथम रोलर स्केटींग खेळाची माहिती,त्याचा इतिहास, प्रारंभ व रोलर स्केटींग खेळाचे नियम,कैशल्य,आयोजन,नियोजनाच्या पध्दती यांच्या संदर्भात प्रकाशित साहित्य व इंटरनेट माध्यमातून शोध घेतला जाईल.

२. दुय्यम स्त्रोत :— पूर्वनियोजित तक्त्याच्या आधारे रोलर स्केटींग खेळातील कौशल्य,नियम. आयोजन व नियोजन या सारख्या विविध प्रकारांची माहिती प्राथमिक व दुय्यम स्त्रोत:व्दारे संकलित केली जाईल.ती विश्लेषणात्मक स्वरूपात मांडली जाईल.

३. आवश्यकतेनुसार प्रश्नावली,मुलाखत तंत्र यांचा देखील वापर केला जाईल.

ड. संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन

अ. सांख्यिकी विश्लेषण :— :—संकलीत माहितीवर संख्याशास्त्रातील टक्केवारी साधन वापरून निष्कर्ष काढले जातील.

ब. अर्थ निर्वचन :— उपरोक्त तालिकाकरणानंतर ज्या त्या मुद्दयातील साम्यता व भेट हे तुलना करून शोधले जातील व त्यावर आधारित विश्लेषणात्मक निष्कर्ष मांडले जातील.

१२. प्रकरण योजना :—

प्रस्तुत संशोधनासाठी संकलित माहितीचे पुढील पाच प्रकरणात

विभाजन करणेत येईल.

१२.१ प्रकरण एक :—

प्रस्तावना :— या प्रकरणात संशोधनाच्या अनुषंगाने प्रास्ताविक, स्पष्टीकरण संशोधनाचे महत्त्व,उद्‌दिष्टये,गृहीतके,मर्यादा व व्याप्ती, पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या व अर्थ अशा बाबींचा समावेश केला जाईल.

१२.२ प्रकरण दोन

संबधीत साहित्याचा आढावा :— प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाच्या अनुषंगाने इतरांनी केलेल्या अभ्यासाचे संदर्भ,तसेच सदर संशोधनात निष्कर्ष काढण्याच्या दृष्टीने उपयोगी पडतील अशा अभ्यासांचे संदर्भ

यांचा आढावा घेण्यात येईल.

१२.३ प्रकरण तीन

संशोधनाची कार्यपध्दती :— सदरच्या प्रकरणात संशोधनाची कार्यपध्दती कार्यपध्दती कोणती व ती पध्दती का व कशी वापरली याचे विवेचन देण्यात येईल.तसेच माहीतीचे संकलन कशा प्रकारे केले,संकलित माहितीचे विश्लेषण कशा पध्दतीने करण्यात आले अशा अनेक बाबींचा आंतर्भाव या प्रकरणात असेल.

१२.४ प्रकरण चार

संकलित माहितीचे विश्लेषण अर्थ निर्वचन :— या प्रकरणामध्ये रोलर स्केटींग खेळाच्या सद्यस्थितीचा अभ्यास व त्यांच्य वाढीसाठी करावयाच्या

उपाययोजनांच्या माहीतीचे तालीकाकरण करून मुद्दनिहाय अर्थ निर्वचन कसे केले याचे स्पष्टीकरण देणेत येईल.

१२.५ प्रकरण चार

निष्कर्ष आणि शिफारशी :– पाचव्या व अखेरच्या प्रकरणात सदर संशोधनातुन हाती आलेल्या निष्कर्षाचा उहापोह केला जाईल. त्याबरोबर सारांश,अनुमोन व शिफारशी याचा समावेश असेल.

अ.नं.	कालावधीत पूर्ण करावयाची कामे	कालावधी
१	संशोधनाची रूपरेशा तयार करणे	जुन २०१६
२	संबधीत साहित्याचे सिंहावलोकन	जुलै ते सप्टेंबर २०१६
३	संशोधनाची कार्यपध्दती निश्चित करणे	ऑक्टोबर ते नोव्हेबर २०१६
४	माहितीचे संकलन	डिसेबंर २०१६ते मे २०१७
५	स्कंलित माहिति स्पष्टीकरण	जुन ते ऑगष्ट २०१७

६	अर्थ निर्वचन/सारांश	सप्टेंबर ते नोव्हेबर २०१७
७	कच्चे अहवाल लेखन	डिसेंबर ते मार्च २०१८
८	प्रबंधाचे टंकलेखन, बांधणी व सादरीकरण	एप्रिल ते जुन २०१८
	एकूण कालावधी	२४ महिने

संशोधनाचे वेळापत्रक :—

१४. संदर्भ ग्रंथ :—

१. बापट डॉ.भा.गो.(१९८६) शैक्षणीक संशोधन,नुतन प्रकाशन,सदाशिव पेठ,पुणे

२.जर्दे श्रीपाल(१९९५) शारीरिक संशोधन तंत्र व पध्दती,चंद्रमा प्रकाशन,कोल्हापूर

३.प्रा.विनोद धरम(२००१) आंतरराष्ट्रीय विविध खेळ नियम व

शास्त्रोक्त माहिती.

४.डॉ.भिताडे – सामाजीक शिक्षण संशोधन पध्दती

५. ूणैवकीहंदहंण्बवउ

प्रा.डॉ.सौ.शारदा अतिरूध्द संगावार — मार्गदर्शक

श्री.महेशचंद्र अभिमन्यु कदम — संशोधक